# मार्क्सवादी इतिहासकार रोमिला थापर

**मोहिते दिगंबर तुळशीदास**
सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग
तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती

भारतातील अनेक क्षेत्रांमध्ये भारतीय स्त्रीने आपल्या कर्तृत्वाने उंच झेप घेतली आहे. ते क्षेत्र म्हणजे इतिहासलेखन क्षेत्र होय. या मध्ये रोमिला थापर यांना मार्क्सवादी इतिहासकार म्हणून ओळखले जाते. मार्क्सवादी रोमिला थापर यांची ओळख मी या शोधनिबंधातून करून देण्याचा प्रयत्न करीत आहे.

**पार्श्वभूमी :**

भारतात इतिहास लेखनाची सुरवात इस्लामच्या आगमनानंतर झाली. या संदर्भात जे. एल. मेहता यांच्या मध्ययुगीन भारताचा बृहत इतिहास खंड एक मध्ये म्हणतात - 'प्राचीन भारतीयांना इतिहासात रस नव्हता तत्कालिन विद्वान धार्मिक, अध्यात्मिक व दार्शनिक चिंतनात रमत असत इतिहास लेखन ही भारताा इस्लाम मिळालेली ची देणगी आहे.'

ब्रिटिश भारतात आल्यानंतर त्यांच्या गरजेतून त्यांनी भारताच्या प्राचीन कालखंडाचा शोध घेतला. यातून भारतात पौर्वात्यवादी इतिहास लेखन सुरू झाले. त्यानंतर ब्रिटिशांनी भारताच्या इतिहासाचे साम्राज्यवादी दृष्टीकोनातून लेखन केले.

त्याला भारतातील नव्या सुशिक्षित पिढीने राष्ट्रवादी इतिहास लेखन करून प्रतिउत्तर दिले. याच पार्श्वभूमीवर भारतात स्वातंत्र्यपूर्व कालखंडातच मार्क्सवादी इतिहास लेखनाची सुरूवात झाली. मात्र त्याचा खऱ्या अर्थाने विकास सन १९५० नंतरच झाला.

**रोमिला थापर - प्रारंभिक जीवन :**

डॉक्टर रोमिला थापर यांचा जन्म सन १९३१ मध्ये भारतात एका पंजाबी कुटूंबात झाला. पंजाब विद्यापीठातून त्या पदवीधर झाल्या. लंडन विद्यापीठातून त्यांनी डॉक्टरेट मिळवली. प्रथम दिल्ली विद्यापीठात आणि नंतर जवाहरलाल नेहरू विद्यापीठात त्यांनी अध्यापनाचे कार्य केले त्याच बरोबर त्यांनी परदेशातील 'कॅर्निल विद्यापीठ' 'पेन्सलिवॉनिया' विद्यापीठ कॉलेज डिफ्रान्स यासारख्या आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या विद्यापीठात अध्यापन केले आहे. याच सोबत व संशोधकांना मार्गदर्शन करण्यात त्यांचे मोलाचे योगदान आहे.

**रोमिला थापर यांचे लेखन -**

Ashoka and the Decline of the Mauryas, History of India VI, Interpreting early India, Ancient India Social History, Form lineage to state इ. त्यांच्या प्रसिध्द ग्रंथरचना आहेत, यावरून त्यांचा प्राचीन कालखंड हा अभ्यासाचा संशोधनाचा विषय असल्याचे दिसून येते.

Ashoka and the Decline of the Mauryas हा त्यांचा पहिला महत्वाचा ग्रंथ

होय. अशोकाने बौध्द धर्माचा स्वीकार केला. त्यामागील राजकीय व सामाजिकारणांचा परामर्श त्या घेतात त्याच बरोबर मौर्य साम्राज्याच्या ऱ्हासाची कारणमीमांसा करतात.

History of India Vol I हा ग्रंथ तेरा लेखांचा संग्रह आहे. इसवी सन पूर्व सहाव्या शतकामध्ये स्थापन झालेला बौध्दधर्म हा तत्कालीन समाजाची ब्राह्मण धर्मा विरूध्दची प्रतिक्रिया होती असे त्या लिहितात. वैदिक संस्कृती पूर्वीच्या भारतात धार्मिक रूढी आढळत असल्याने वैदिक साहित्य ही फक्त आर्याची निर्मिती आहे या प्रस्थापित मताला त्या छेद देतात. इसवी सन पूर्व १००० ते १३०० समाज गतीहिन, स्थितीशील होता. हा भारतीयांवरील आरोप साम्राज्यवादी इतिहासकारांबरोबरच कार्ल मार्क्सनेही केला होता. रोमिला थापर या मार्क्सवादी विचारवंत असूनही त्यांनी वरील मताचे खंडन केले.

From lineage to State या ग्रंथात गंगेच्या खोऱ्यातील प्रदेशात राज्यव्यवस्थेचा उदय होण्यासाठी कारणीभूत झालेल्या आर्थिक कारणांचा आढावा त्यांनी घेतलेला आहे. प्राचीन भारतातील राज्यांच्या निर्मितीसाठी फक्त राजकीय कारणे कारणीभूत नसून त्याच सोबत सामाजिक, सांस्कृतिक कारणे महत्त्वाची ठरल्याचे त्या सांगतात.

Ideology and Interpretation of Early India ह्या प्रदीर्घ लेखात आर्यवंशाच्या संकल्पनेविषयी साम्राज्यवादी इतिहासकारांनी मांडलेल्या विचारांना त्या छेद देतात.

**समारोप :**

डॉ. रोमिला थापर यांचे लिखाण त्यांच्या मार्क्सवादी विचारसरणी बरोबरच त्यांच्या स्वतंत्र बुध्दीचे, सखोल अध्यापनाचे, चिकित्सक विश्लेषणक्षमतेचे व सृजनशील प्रतिभेचे दर्शन घडवतात.

**संदर्भ सूची -**

१. मेहता जे एल. - मध्ययुगीन भारताचा बृहत इतिहास, खंड एक के सागर प्रकाशन पुणे, २०१४ पा. नं. ९

२. डॉ. थापर रोमिला - अर्लि इंडिया, प्रथम आवृत्ती के सागर प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती २००७.

३. डॉ.शांता कवठेकर - इतिहास तंत्र तत्वज्ञान, श्री साईनाथ प्रकाशन नागपूर, २००६ पा.नं. २३०.

४. कित्ता

***